N·A Order

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग

दुरध्वनी क्र.-020-22943121
E- Mail- tahsildarmulshi@gmail.com

**तहसिलदार कार्यालय,मुळशी.**
पौड ता. मुळशी जि. पुणे

******************************************************

**जा.क्रं.४२ब/जमिन/एनए/एसआर१३/२०२१** **दि. ०५/०३/२०२१**

**प्रति,**

**तलाठी पुनावळे**
**ता. मुळशी जि. पुणे**

**विषय :- जमिन अकृषिक झाल्याची नोंद संबधित जमिनीच्या गाव नमुना ७/१२ सदरी घेणेबाबत.**

मौजे पुनावळे, ता-मुळशी, पुणे येथील जमीन स.नं./ग.नं. २५/१, २५/२, २७/५ क्षेत्र ०३ हे ६४.९५ आर बांधकाम/रेखाकंन नकाशात सामाविष्ट केलेल्या २८२५९.९१ चौ. मी. क्षेत्रापैकी रस्त्याखालील क्षेत्र १०७१.०१ चौ. मी. वजा जाता २७१८८.९० चौ. मी. क्षेत्रापैकी ३८०.७९ चौमी क्षेत्रास वाणिज्य प्रयोजनार्थ व २६८०८.११ चौ. मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ मधील सुधारणा करीता अध्यादेश २०१७ नुसार कलम ४२ ब मधील तरतुदीनुसार अकृषिक सारा आकारणी करुन मिळणेबाबत..

तहसिलदार मुळशी (पौड)

**संदर्भ - १.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरीताचा दिनांक ०५/०१/२०१७ चा अध्यादेश.

२. अर्जदार यांचा दि. २४/०२/२०२१ रोजीचा अर्ज.

२/- उपरोक्त नमुद विषयान्वये, महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील दिनांक ०५/०१/२०१७ रोजीचा अधिसुचनेच्या अनुषंगाने मौजे पुनावळे, ता-मुळशी, पुणे येथील जमीन स.नं./ग.नं. २५/१, २५/२, २७/५ क्षेत्र ०३ हे ६४.९५ आर बांधकाम/रेखाकंन नकाशात सामाविष्ट केलेल्या २८२५९.९१ चौ. मी. क्षेत्रापैकी रस्त्याखालील क्षेत्र १०७१.०१ चौ. मी. वजा जाता २७१८८.९० चौ. मी. क्षेत्रापैकी ३८०.७९ चौमी क्षेत्रास वाणिज्य प्रयोजनार्थ व २६८०८.११ चौ. मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ चे कलम ४२ ब नुसार जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा आणि ती वरील भार याबाबत विनिश्चिती करणेबाबत अर्जदार मे. जी के असोसिएटस तर्फे प्रोप्रायटर श्री. विनोद प्रेमचंद चांदवाणी रा सिंध सोसायटी पुणे ४११००७ यांचा २४/०२/२०२१ रोजीचा कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त झाला आहे.

अर्जदार यांनी विनंती केलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | गावाचे नाव | तालुका | सर्व्हे/गट/सिटी सर्व्हे नं. |
|---|---|---|---|
| १ | पुनावळे | मुळशी | २५/१, २५/२, २७/५ |

| अ.क्र | जमिन मालकाचे नाव | स. नं./ ग. नं. | ७/१२ नुसार क्षेत्र | बांधकाम/रेखांकन परवानगी द्यावयाचे क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|---|
| १ | गिरीराज एंटरप्रायझेस करीता भागीदार आशिष माधव मालपाणी लँडमार्क प्रापर्टीज प्रा. लि. तर्फे संचालक आशिष माधव मालपाणी | २५/१ | १.१३.९५ | **२८२५९.९१** |
| | आशिष माधव मालपाणी लँडमार्क प्रापर्टीज प्रा. लि. तर्फे संचालक | २५/२ | ०.५४ | |
| | आशिष माधव मालपाणी लँडमार्क प्रापर्टीज प्रा. लि. तर्फे संचालक | २७/५ | १.९७ | |
| | | **एकुण क्षेत्र** | **०३.६४.९५** | |
| २ | उपरोक्त नमुद केलेप्रमाणे यापुर्वी अकृषिक परवानगी देणेत आलेले क्षेत्र | | | ००.०० |
| ३ | प्रादेशिक योजनेतील रस्त्याखालील क्षेत्र | | | १०७१.०१ |
| ४ | रेखांकन नकाशामध्ये समाविष्ठ करण्याचे निव्वळ क्षेत्र | | | २७१८८.९० |
| ५ | सद्यस्थितीमध्ये अकृषिक आकारणे करणेचे क्षेत्र | | | २७१८८.९० |
| | | | | **रेखांकनाचे प्रयोजन** |
| | | | **निवासी** | **२६८०८.११** |
| | | | **वाणिज्य** | **३८०.७९** |

प्रकरणी या कार्यालयाकडील पत्र जा. क्रं. ४२ब/जमिन/एन ए/एस आर/१३/२०२१ दिनांक. ०२/०३/२०२१ अन्वये खालीलप्रमाणे अकृषिक सारा, रुपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकिय देणे शासन जमा करणेबाबत अर्जदार यांना कळविणेत आलेले होते.

| अ.क्र | अकृषिक आकारणीचा तपशील | तपशील |
|---|---|---|
| १ | **बिगरशेती करावयाचे क्षेत्र (चौ.मी.)** | **२७१८८.९०** |
| २ | **निवासी प्रयोजनासाठी बिगर शेती करावाचे क्षेत्र** | **२६८०८.११** |
| | बिनशेती आकारणीचा दर रुपये (प्रति/चौ.मी.) (निवासी प्रयोजन) | ०.६१२ |
| | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी रक्कम रुपये | १६४०६.५६ |
| ३ | **रुपांतरीत कराची आकारणी रक्कम रुपये** | ८२०३२.८० |
| ४ | **एकुण आकारणी** | **९८४३९.३९** |
| ५ | **वाणिज्य प्रयोजनासाठी बिगर शेती करावाचे क्षेत्र** | **३८०.७९** |
| | बिनशेती आकारणीचा दर रुपये (प्रति/चौ.मी.) (वाणिज्य प्रयोजन) | १.२२४ |
| | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी रक्कम रुपये | ४६६.०९ |
| ६ | **रुपांतरीत कराची आकारणी रक्कम रुपये** | २३३०.४५ |
| ७ | **एकुण आकारणी** | **२७९६.५४** |
| ८ | जिल्हा परिषद कर रक्कम रुपये | ०० |
| ९ | ग्रामपंचायत कर रक्कम रुपये | ०० |
| १० | **एकुण आकारणी** | **१०१२३५.९३** |

त्यानुसार वरीलप्रमाणे नमुद अकृषिक सारा, रुपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा केलेबाबत अर्जदार यांनी डिफेस्ड चलन क्रं. GRN No MH ०००५९४२८५८२०२०२१ दिनांक ०४/०३/२०२१ या कार्यालयास सादर केले आहे.

तसेच विषयांकित मिळकतीवरील रेखांकन/बांधकाम नकाशास पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पत्र क्रं बी.पी/पर्यावरण/पुनावळे/०१/२०२१ दिनांक १३/०१/२०२१ अन्वये दिलेला प्रारंभपत्राची व बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे.

सबब, आपणास या पत्रान्वये कळविणेत येते की, महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील दिनांक ०५/०१/२०१७ रोजीचा अधिसुचनेच्या अनुषंगाने विषयांकीत नमुद मिळकत अकृषिक झालेबाबतची योग्य ती नोंद नमुद मिळकतीचे ७/१२ सदर घेण्याकामी तसेच त्यानुसार गाव नमुना नं २ दुरुस्त अधिकार अभिलेखाची प्रत व फेरफार अर्जदार उपलब्ध करुन देणेबाबत आपणांस सुचित करणेत येत आहे. तसेच विषयांकित मिळकत अकृषिक झालेबाबतची नोंद नमुद मिळकतीचे ७/१२ सदरी व गाव नमुना नं २ ला झालेबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सही/-XXX**
**(अभय चव्हाण)**
**तहसिलदार मुळशी (पौड)**

**प्रत** :- मे. जी के असोसिएटस तर्फे प्रोप्रायटर श्री. विनोद प्रेमचंद चांदवाणी रा सिंध सोसायटी पुणे ४११००७ यांना माहितीस्तव रवाना.

**प्रत** :- कार्यकारी अभियंता बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे १८ यांना माहीतीस्तव रवाना.

तहसिलदार मुळशी (पौड)

**(अभय चव्हाण)**
**तहसिलदार मुळशी (पौड)**